ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख २७ डिसेंबर, १९५० अंक ४९




## रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

### पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.
तारेचा पत्ताः—PEDNECO, Bombay. फोन नं. २२७३८

## कूळ व शेतजमीन कायदा

आवृत्ती दुसरी प्रसिद्ध झाली. किं. ४ रु. कूळकायदा (१९३९) आवृत्ति ३ री किं. ३ रु., तुकडेबंदी व जमीन एकत्रीकरण कायदा किं २ रु. भाडेनियंत्रण कायदा किंमत २ रु., शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४॥ रु., मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु., द्विभार्या—प्रतिबंधक कायदा (आवृत्ति ३ री) किंमत १ रु., हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु., खंडपावत्यांचें पुस्तक ८ आणे.

पत्ताः—लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

दळणाच्या चक्क्या—टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडवा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधु, लक्ष्मी रोड, पुणें शहर.


## विविध माहिती

**बिहारमधील बेकारांची नोंद**—पाटणा येथील उद्योग-विनिमय केंद्रांत २ लाख बेकारांची नोंद करण्यांत आली आहे. नोंद न झालेल्या बेकारांची संख्या सुमारें ६ लाख असावी असा केंद्राच्या अधिकाऱ्यांचा अंदाज आहे.

**गांवसमासाठी रेडिओ**—उत्तर प्रदेशाचें सरकार सर्वत्र वाटण्यासाठी रेडिओ तयार करण्याची खटपट करीत आहे. अपेक्षेप्रमाणें थोड्या खर्चात रेडिओ तयार झाल्यास उ. प्रदेशांतील ३५,००० खेड्यांना एकाच वेळीं लहरीवर ऐकू येणारे रेडिओ वांटण्यांत येतील. प्रत्येक रेडिओला ८० रुपये खर्च येईल व तो ड्राय बॅटरीवर चालविण्यांत येईल. सर्व योजनेसाठी राज्य-सरकारला ४ वर्षांत मिळून २५,००,००० रुपये खर्च येईल.

**ताडीच्या गुळाची विक्री**—पालघाट ( मद्रास राज्य ) येथील एका सहकारी विक्रीसंघानें ताडीपासून तयार केलेल्या ३७,००० रुपये किंमतीच्या गुळाचा लिलांव केला. दारूबंदी झाल्यापासून ताड कामगारांच्या सहकारी संस्था गूळ तयार करण्यासाठी स्थापन करण्यांत आल्या आहेत. तयार झालेला गूळ पूर्वी प्रत्येक संस्था स्वतंत्रपणें विकत असे. पण सर्व संस्थांनीं मिळून विक्री केल्यानें गुळाला अधिक किंमत आली.

**अमेरिकेकडून अन्नधान्याची खरेदी**—अमेरिकेकडून २० लाख टन अन्नधान्य विकत घेण्याची खटपट भारत सरकार करीत आहे. ह्या धान्यासाठी द्यावयास लागणारे पुरेसे डॉलर्स भारताजवळ नसल्यानें किंमत देण्यासंबंधीं कांहीं निराळी व्यवस्था करावी लागेल, असें अमेरिकेला कळविण्यांत आलें आहे.

**बँकेच्या कारकुनांच्या मागण्या**—मुंबई प्रां. सहकारी बँकेच्या दोनशे नोकरांनीं आपल्या मागण्या चालकांकडे सादर केल्या आहेत. बँकिंग ट्रायब्यूनलच्या निवाड्याप्रमाणें आपल्या पगारांची श्रेणी निश्चित करण्यांत यावी असें ह्या नोकरांचें म्हणणें आहे. ट्रायब्यूनलचा निवाडा सहकारी बँकांना लागू नाहीं.

**भारताचा नोव्हेंबरमधील व्यापार**—भारतीय सरकारच्या खात्यातर्फे जाहीर झालेल्या आंकड्याप्रमाणें नोव्हेंबर महिन्यांत भारतानें ९७१९ लाख रुपयांचा व्यापार केला. ह्यापैकीं निर्यात ५,२३९ लाख रु. ची झाली, पुनर्निर्यात ३६५ लाख रु. ची झाली आणि आयात ४,११५ लाख रु. ची झाली.

**अर्जेंटिनाची लोकसंख्या**—१९१४ ते १९४७ ह्या ३३ वर्षांच्या कालांत अर्जेंटिनाची लोकसंख्या दुप्पट झाली. १९१४ सालीं त्याची लोकसंख्या ७८,८५,२३७ होती. १९४७ सालीं ती १,५८,९३,८२७ झाली. १९४७ सालानंतर जो अंदाज करण्यांत आला आहे, त्यावरून पहाता, आतां ह्या देशाची लोकसंख्या ७,७०,००,००० असावी.

**भारतीय सरकारनें गुंतविलेलें भांडवल**—भारत स्वतंत्र झाल्यापासून मध्यवर्ती सरकारनें औद्योगिक व्यवसायांत २७ कोटी, ४५ लक्ष रुपयांची रक्कम गुंतविली. गुंतवणुकीचा तपशील पुढील प्रमाणें आहे:–सिंद्री येथील खताच्या कारखान्यांत १६ कोटी, ५० लक्ष रु. चित्तरंजन रेल्वे एंजिनच्या कारखान्यांत ७ कोटी, ८७ लक्ष रु. तयार घरांच्या कारखान्यांत ५३ लक्ष रुपये. टेलिफोनच्या कारखान्यांत ९२ लक्ष रु. ह्या शिवाय आणखीही कांहीं कारखान्यांतून रक्कम गुंतविण्यांत आली आहे. हे बहुतेक सर्व कारखाने सरकारच्या मालकीचेच आहेत.

**इजिप्तमधील नवी आगगाडी**—इजिप्तसाठी एका ब्रिटिश कारखान्यानें डिझेल तेलावर चालणारी एक आगगाडी तयार केली आहे. कैरो ते अलेक्झांड्रीया ह्या रस्त्यावर ही गाडी धावूं लागली आहे. ह्या दोन शहरांतील अंतर १३० मैल असून तें तोडण्यास गाडीला २ तासांपेक्षांहि कमी वेळ लागतो. गाडीला ५ डबे आहेत.

**भारतीय विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण**—कोलंबो योजनेंत ठरल्याप्रमाणें ऑस्ट्रेलिआनें परदेशीय विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या देण्याचें ठरविलें आहे. त्यापैकीं भारताच्या वांटणीला ३० शिष्यवृत्त्या आल्या आहेत. पाकिस्तानला ३० व सिलोनला १५ शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या आहेत. भारतीय विद्यार्थ्यांना देण्यांत येणाऱ्या शिष्यवृत्त्या इलेक्ट्रिकल एंजिनिअरिंग, सिव्हिल एव्हिएशन, रेल्वे व खाणी, इत्यादि विषयांच्या आहेत.

**ताग देऊन तांदूळ मिळणार ?**—पेकिंगच्या चिनी सरकारनें कांहीं दिवसांपूर्वी भारताकडे पोत्यांची मागणी केली होती असें समजतें. पोत्यांच्या बदला भारताला १० लाख टन तांदूळ देण्याची तयारी चीननें दाखविली होती. सोयाबीन, मुंगमूग इ. माल सो. रशियाला पुन्हां निर्यात करण्यासाठी पोत्यांची गरज चीनला भासत होती. आज शांघायमध्यें एका पोत्याला .१। डॉलर किंमत पडते. युद्धानंतर ती २० सेंटस पडत असे.

**१९५१ चें अंदाजपत्रक**—भारताच्या नव्या घटनेंत चालू खर्च चालविण्यासाठी बिगर तपशीलाच्या रकमा मंजूर करण्यासाठी आणि नंतर वर्षाच्या मध्याच्या सुमारास त्यावर चर्चा करण्याची सोय आहे. तरी सुद्धां तसें न करतां, १९५१ सालांत अंदाजपत्रकासंबंधीं पूर्वीचीच पद्धत अनुसरण्यांत येणार आहे असें समजतें. अंदाजपत्रक सादर करण्याची वेळ ठरविणें हें काम नव्या निवडणुका झाल्यावर त्या पार्लमेंटवरच सोंपविण्यांत येईल असें दिसतें.

**सैनिकांच्या सन्मानार्थ पोस्टाचीं तिकिटें**—कोरियन युद्धांत लढणाऱ्या तुर्की सैनिकांचा सन्मान करण्यासाठी तुर्कस्थानच्या सरकारनें पोस्टाचीं खास तिकिटें काढण्याचें ठरविलें आहे.

**कोईमतूर येथील साखर संशोधन परिषद**—शुगरकेन अँण्ड डेव्हलपमेंट वर्कर्स कॉन्फरन्स ह्या संस्थेची पहिली परिषद ता. ९ ते १२ जानेवारी, १९५१ पर्यंत कोईमतूरला भरणार आहे.


व्यापारी व कारखानदार
यांचे प्रश्न सोडविण्यास मदत करूं व सल्ला देऊं.
— ३० वर्षांचे अनुभवी. —
कंपनी कायदा व मॅनेजमेंट, रेकार्डस्, ऑफिस मॅनेजमेन्ट व आर्गनायझेशन कॉस्टिंग्ज्, व्यापारी व ऑफीस चार्टस्, वगैरे कामें माफक फी घेऊन करून देऊं. लिहा:—
जी. के. अँण्ड सन्स,
विद्यामंदिर, मुंबई २४.

# अर्थ

बुधवार, ता. २७ डिसेंबर, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## युद्धोपयोगी कच्च्या मालाची वांटणी

कोरिआच्या युद्धांत उत्तर कोरिआच्या बाजूनें कम्युनिस्ट चीननें हस्तक्षेप केल्यावर संयुक्त राष्ट्रसंघाच्या फौजांना पुन्हां माघार घ्यावी लागली. त्या निमित्तानें अतिपूर्वेकडील राजकीय प्रश्नांचा प्रे. ट्रुमन ह्यांच्याशी विचार विनिमय करण्यासाठी ब्रिटनचे पंतप्रधान मि. ॲटली हे गेले होते. इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या प्रमुखांत ज्या वाटाघाटी झाल्या त्यांत युद्धाच्या दृष्टीनें महत्वाच्या अशा वस्तूंच्या वाटणीचा विषयही अंतर्भूत करण्यांत आला होता. प. युरोप आणि अमेरिका आतां युद्धाच्या अर्थशास्त्राचा उघडपणें व तातडीनें विचार करूं लागली आहेत असाच ह्याचा अर्थ आहे.

इंग्लंड आणि अमेरिका ह्यांच्या हल्लींच्या परस्पर संबंधांतील हा एक नाजूक धागा आहे. अटलांटिक करारांत सामील असलेल्या राष्ट्रांनीं आपलें लष्करी सामर्थ्य वाढविण्याचें ठरविल्यापासून त्यांना कच्च्या मालाचा तुटवडा पडूं लागला आहे. ब्रिटिश मजूर पक्षांतील पुष्कळांचें असें मत आहे कीं हा तुटवडा भरून काढण्याची व्यवस्था झाली नाहीं तर युद्धोपयोगी साहित्याचें उत्पादन पुरेसें होणार नाहीं. ह्या मालाचा भरपूर पुरवठा झाला तरी त्याची वांटणी तीन निरनिराळ्या प्रकारच्या उत्पादनासाठी करावी लागेल; (१) ब्रिटनमधील घरच्या बाजारपेठेसाठीं करावयाचें उत्पादन; (२) निर्यातीसाठी उत्पन्न करावयाचा माल आणि (३) लष्करी सामुग्रीचें उत्पादन. हे वांटणीचें कामही तितकेसें सोपें नाहीं. सध्या ब्रिटनमध्यें ज्या मालाचा तुटवडा भासत आहे त्यांत पुढील वस्तू आहेत. कापूस, गंधक, लाकडाचा गंधा, कथील, तांबें आणि अल्युमिनम्. ह्या वस्तूंचा सध्या जो सांठा इंग्लंडमध्यें आहे तो फार काळ पुरण्यासारखा नाहीं. सांठे संपल्यावर कांहीं कारखाने अर्धेमुर्धे चालवावे लागतील अगर कदाचित बंदही करावे लागतील. अमेरिकेची स्थिति मात्र अशी नाहीं. ह्यांपैकीं बहुतेक वस्तू अमेरिका स्वतःच उत्पादन करूं शकते, किंवा त्यांच्या निर्यातीवर नियंत्रण ठेवूं शकते. त्यामुळें अमेरिकेंतील उत्पादकांना ह्या वस्तू मिळूं शकतात. परदेशांतील गिऱ्हाइकांना मात्र त्या मिळत नाहींत अगर मिळाल्या तरी त्यांच्यासाठीं फार किंमत त्यांना द्यावी लागते.

अमेरिका सोडून प. युरोपांतील इतर देशांना महत्वाच्या कच्च्या मालाचा जो तुटवडा भासत आहे त्याचें कारण काय? ब्रिटनमध्यें ह्यासंबंधीं असें मत व्यक्त करण्यांत येत आहे कीं, अमेरिकेनें संभाव्य तिसऱ्या महायुद्धासाठीं ह्या वस्तूंचा भरमसाट सांठा केला आहे. आज जगाच्या बाजारांत डॉलरला जो भाव व प्रतिष्ठा आहे त्यामुळें अमेरिकेला असे सांठे करणें सहजीं शक्य आहे. ब्रिटन–फ्रान्स सारख्या आर्थिक दृष्ट्या दुबळ्या झालेल्या राष्ट्रांना तसें करणें शक्य होत नाहीं. आवश्यक ह्या वस्तूंचे खूप मोठे सांठे केल्यानें अमेरिकेची सुरक्षितता राखली जाईल हें खरें. पण, त्याचबरोबर इतर राष्ट्रांचें सामर्थ्य लवकर वाढणार नाहीं, असा हा पेच आहे. शिवाय सांठे करण्याच्या धोरणाचे आर्थिक परिणामही विपरीत होतात. सरकारच्या वस्तू विकत घेण्याच्या धोरणामुळें त्या वस्तू अधिक किंमतीच्या अपेक्षेनें बाजारांत लवकर आणण्यांत येत नाहींत आणि किंमती अधिकच चढतात, अशा परिस्थितींत मि. ॲटली आणि मि. ट्रुमन ह्यांच्या वाटाघाटींत राजकीय व लष्करी बाबींबरोबरच युद्धविषयक मालाच्या वांटणीची चर्चा होणेंही अपरिहार्यच होतें.

---

### फ्रान्स भारताला मदत करूं शकेल.

एम. आंद्रे झिग फ्रिड हे सुप्रसिद्ध फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ सध्यां भारतांत आले आहेत. भारतांतील उद्योगधंद्यांची वाढ आणि सुधारणा करण्याच्या कामीं फ्रान्स कशा प्रकारची मदत करूं शकेल, यासंबंधीची कल्पना त्यांनीं एका मुलाखतीच्या द्वारें दिली आहे. ते म्हणाले, “बहुतेक लोकांची अशी समजूत झालेली आहे कीं फ्रान्समध्यें फक्त कलात्मक आणि चैनीच्या वस्तूंचीच पैदास होते. ही गोष्ट खरी नाहीं. मोटारींचा धंदा, पाटबंधारे, यंत्रांचे लहान लहान भाग, इ. बाबतींत फ्रान्स भारताला चांगली मदत करूं शकेल. गेल्या दोन वर्षांत फ्रान्सची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. माझ्या देशांत जी आर्थिक प्रगति झाली आहे, ती खाजगी भांडवलाच्या पुढाकारामुळेंच जास्त झाली आहे. फ्रान्समधील कोळसा व वीज ह्या धंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें आहे. परंतु त्यांच्यापेक्षां अधिक प्रगति खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांत झाली आहे. उदाहणार्थ—कापड, रसायनें व अन्नविषयक धंदे. पश्चिम युरोपच्या पोलादाच्या व कोळशाच्या धंद्याचें एकीकरण करण्यास फ्रेंच जनता अनुकूल आहे. कारण, आर्थिक ऐक्य झाल्याशिवाय राजकीय ऐक्य परिणामकारक होणार नाहीं अशी फ्रेंच लोकांची कल्पना आहे. भारत व फ्रान्स ह्यांच्यांतील सांस्कृतिक संबंध अधिक दृढ होतील अशी मला आशा आहे. बऱ्याच फ्रेंच विद्यापीठांतून संस्कृत शिकविलें जातें. आशियाच्या भूगोलावर विशेष भर देण्यांत येतो. कांहीं फ्रेंच प्राध्यापक आज भारतांत शिकविण्याचें कार्यहि करीत आहेत.”

---

### भारतांत मशीन टूल्सच्या कारखान्याची उभारणी

अर्थमंत्री श्री. चिं. द्वा. देशमुख यांचे अध्यक्षतेखालीं ता. २० डिसेंबर रोजीं येथें भरलेल्या स्थायी अर्थ समितीनें, एका स्विस फर्मच्या मदतीनें भारतांत मशीन टूल्सचा कारखाना उभारण्यासाठीं लागणाऱ्या खर्चास संमति दिली आहे.

समितीनें खर्चाला मान्यता दिलेल्या आणखी कांहीं योजनांत, विजगापट्टम येथील बोटी बांधण्याच्या गोदींत तीन बोटी बांधणें, टेलिफोनच्या केबल तयार करणाऱ्या कारखान्याची उभारणी, मदुरा, सुरत, येथें टेलिफोनची व्यवस्था, यंदा स्थापन केलेल्या राष्ट्रीय प्रयोगशाळांसाठीं अधिक खर्चाची तरतूद आणि दिल्ली येथें प्रसूति व बाल आरोग्य यांचें उच्च शिक्षण देण्याची नवी योजना, या आहेत.

---

## बँकिंगचे व क्लिअरिंगचे तास कमी करणें अनिष्ट

२० सप्टेंबर, १९५० पासून बँकांच्या कामाचे तासांत व क्लिअरिंगमध्यें कशी कपात झाली आहे व त्यामुळें बँकांच्या सेवेंत कशी घट झाली आहे, ह्याचें थोडक्यांत विवेचन आम्हीं गेल्या अंकांत केलें आहे. मुंबईच्या स्टॉक एक्सचेंजनें ह्या पुच्छप्रगतीचा तीव्र निषेध केला आहे:— " कमी काम आणि जास्त पगार, अशी सर्व क्षेत्रांत (बँकिंग धरून) हल्ली मागणी आहे. ती मागणी इतर दृष्टींनीं समर्थनीय मानली तरी सुद्धा ती पुरी पाडण्याइतका भांडवलाचा पाया मजबूत नाहीं, हें स्पष्ट आहे. अधिक उत्पादन, दर माणशीं तर ताशीं जास्त उत्पादनशक्ति, हें घडून आल्याखेरीज आपल्या देशांतील सध्याचें रहाणीचें मान टिकूं सुद्धा शकणार नाहीं, वाढण्याचें तर दूरच राहो. जास्त कसून काम केल्याविना जास्त वेतन कोठून मिळणार ? बँक ही राष्ट्राच्या आर्थिक संसाराची एक महत्त्वाची घटक आहे आणि तिची कार्यक्षमता व सोयी ह्यांत वाढच होत गेली पाहिजे हें लक्षांत घेऊनच बँकांचे चालक, नोकर, सरकार आणि इंडस्ट्रियल ट्रायब्यूनल्स ह्यांनीं त्यांतील वांधयांचा विचार केला पाहिजे. ह्या उलट, बँकिंगच्या सोई कमी होत चालल्या आहेत. आणि त्यांच्या उपयुक्ततेस बाध येत आहे. जनतेला हें सर्व पटत नसलें, तरी तें घडूं नये ह्या दृष्टीनें कांहिंहि ती करूं शकत नाहीं. जनता ही विखुरलेली आणि असंघटित असल्यानें, ती ह्या प्रवृत्तीस तोंड देण्यास असमर्थ झाली आहे. दररोज दोनदा क्लिअरिंग, निदान रोजचें क्लिअरिंग उशीरा होणें आणि बँकिंगच्या कामांत वाढ होणें जनतेच्या हिताच्या दृष्टीनें अगत्याचें आहे. ह्यासाठी रिझर्व्ह बँक, इंडियन बँक्स असोसिएशन, एक्सचेंज बँक्स असोसिएशन, बँक नोकरांच्या युनियन्स, क्लिअरिंग बँकर्स कमिटी, इत्यादींनीं ह्या प्रश्नाचा नीट विचार करून बँकिंगची उपयुक्तता वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. "

### मुंबईतील बँक क्लिअरिंगची सोय कशी कमी होत गेली ?

| क्लिअरिंग | ३१-१०-४५ पूर्वी | १-११-४५ ते ४-२-४६ | ५-२-४६ ते ३१-१२-४६ | १-१-४७ ते ३१-३-४७ | १-४-४७ ते २१-३-४८ | २२-३-४८ ते १९-९-५० | २०-९-५० पासून |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सोमवार ते शुक्रवार | | | | | | | |
| पहिलें क्लिअरिंग | १२.१५ | ११.४५ | १२.४५ | १.०० | १२.१५ | १२.४५ | १२.४५ |
| दुसरें क्लिअरिंग | २.३० | २.०० | नाहीं | नाहीं | नाही | नाहीं | नाहीं |
| शनिवार क्लिअरिंग | ११.४५ | ११.३० | ११.३० | ११.३० | ११.३० | ११.३० | नाहीं |

### मुंबई बँकिंगच्या तासांत कपात

| कामाचे तास | १४-६-४२ पूर्वी | १५-६-४२ ते ३०-९-४२ | १-१०-४२ ते ३१-३-४७ | १-४-४७ ते १९-९-५० | २०-९-५० पासून |
|---|---|---|---|---|---|
| सोमवार ते शुक्रवार | | | | | |
| सुरवात | ११.०० | १०.०० | १०.३० | १०.३० | १०.४५ |
| बंद | ४.३० | ३.०० | ३.३० | २.३० | २.१५ |
| एकूण तास | ५½ | ५ | ५ | ४ | ३½ |
| शनिवार | | | | | |
| सुरवात | ११.०० | १०.०० | १०.३० | १०.३० | १०.४५ |
| बंद | २.३० | १२.३० | १.०० | १.०० | ११.४५ |
| एकूण तास | ३½ | २½ | २½ | ३½ | १ |
| एकूण साप्ताहिक तास | ३१ | २७½ | २७½ | २२½ | १८½ |

### सुखाच्या भावनेंत आर्थिक कारणांचें स्थान

लोकमत अजमावणाऱ्या एका फ्रेंच संस्थेला अशी शंका आली कीं फ्रान्समधील लोकांची आनंदी वृत्ति कमी कमी होत चालली आहे. युद्ध संपल्यानंतरच्या पांच वर्षांत ही घटना विशेष वाढीस लागल्याचें ह्या संस्थेस आढळून आलें आहे. संस्थेनें जी आंकडेवारी माहिती जनतेला प्रश्न विचारून गोळा केली ती बरीच उद्बोधक आहे. सर्वसाधारण फ्रेंच नागरिक आज जगण्याच्या विवंचनेंत आहे. जीवनाबद्दल त्याचा उत्साह मावळत चालला आहे. वाढत्या महागाईमुळें त्याचें जीवन चिंताग्रस्त झालेलें आहे. वाढलें घरभाडें, अन्नाच्या चढत्या किंमती, महागें कापड, यामुळें तो रंजीस आला आहे. संभाव्य युद्धाची छाया व अनिश्चित भविष्यकाल ह्या दोन्हींची भीतीही त्याला वाटत आहे. त्याशिवाय प्रेम-प्रकरणें, आजार, परीक्षा, नौकरीची चिंता इत्यादि काळज्या आहेतच. फ्रेंच नागरिकांच्या जीवनाची ही शोककथा आकड्यांच्या रूपानें सांगतां येईल.

" तुम्हाला सगळ्यांत अधिक काळजी कशाची वाटते. ? " ह्या प्रश्नाचें उत्तर बहुतेक फ्रेंच नागरिक पुढीलप्रमाणें देतात:—

| | |
|---|---|
| (१) आर्थिक दृष्ट्या जिवंत रहाणें | ४५ टक्के |
| (२) दुसऱ्या युद्धाची भीति | २७ टक्के |
| (३) व्यक्तिगत चिंता | १३ " |
| (४) इतर प्रश्न | १५ " |

सुखाच्या भावनेचें हें मोजमाप युरोपच्या सध्याच्या परिस्थितीचें द्योतक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

### आगामी शिरगणती

भारतांत होणारी शिरगणती ही जगांतील सर्वांत मोठा परंतु अल्पखर्चाची होईल असें म्हटलें जातें. भारताच्या सुमारें ३५ कोटी नागरिकांच्या गणनेच्या आणि त्यांच्या तपशील नोंदणीच्या कामासाठी १ कोटी, ५० लक्ष रु. म्हणजे दर हजार लोकांना ४३ रु. खर्च येईल. अमेरिकेंत १९५० च्या शिरगणतीस दर हजार लोकसंख्येस अंदाजें ६०० डॉलर खर्च आला. भारतांतील शिरगणतीस कमी खर्च लागण्याचें कारण म्हणजे लोकांची गणती करणें, त्यांचा तपशील नोंदविणें, हीं कामें लाखों गणतीदार विनामूल्य करणार आहेत. या कार्यकर्त्यांची निवड बहुतांशीं राज्य सरकारें किंवा नगरपालिका यांच्या नोकरवर्गांतून केली असल्यामुळें मध्यवर्ती सरकारच्या खजिन्यास शिरगणतीचा खर्च बेताचा येणार आहे.

पस्तीस कोटी लोकसंख्येच्या नोंदणीचें हें प्रचंड कार्य फेब्रुवारी, १९५१ च्या सूर्योदयापासून सुरू होणार असून १ मार्च, १९५१ पर्यंत, म्हणजे वीस दिवसांत संपवावयाचें आहे.

### साखर खरेदी बाबत चौकशी

कांहीं खाजगी व्यापाऱ्यांनीं भारतांत साखरेची आयात करण्याची तयारी दाखविली असतां सरकारनें त्या देकाराचा स्वीकार केला नाहीं, या संसदेंत महावीर त्यागी यांनी केलेल्या आरोपाची व या प्रकरणाशीं संबंधित असलेल्या इतर बाबींची चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी भारत सरकारच्या शेतकी मंत्र्यांनीं अलाहाबाद हायकोर्टाचे सेवानिवृत्त न्यायाधीश श्री. गंगानाथ यांची नेमणूक केली आहे. ते सध्या १९४९ च्या जुलै–ऑगस्टमधील साखर टंचाईच्या प्रकरणाची चौकशी करीत आहेत.

### पेन्सिलींच्या धंद्यास संरक्षण

पेन्सिलींच्या धंद्याविषयीं टॅरिफ बोर्डानें सादर केलेल्या प्रतिवृत्तावरील भारत सरकारचा ठराव ९ डिसेंबर १९५० च्या भारताच्या गॅझिटांत प्रसिद्ध झाला आहे. टॅरिफ बोर्डानें इतर गोष्टींबरोबरच सध्यांच्या महसूल जकातीचें संरक्षक जकातींत रूपांतर करावें आणि ती ३१ डिसेंबर, १९५२ पर्यंत चालू रहावी अशी शिफारस केली आहे. शिसपेन्सिलींच्या बाबतींत मूळ किंमतीच्या २५ टक्के किंवा डझनास एक आणा या दोहोंपैकीं जी रक्कम जास्त असेल ती आणि रंगीत किंवा कॉपिंग पेन्सिलींच बाबतींत ३७॥ टक्के अशी सध्यां महसूल जकात आहे. त्याचप्रमाणें, आयात पेन्सिलींच्या सध्यांच्या सी. आय. एफ्. किंमतींना धरून शिसपेन्सिलींवरील वैकल्पिक विशिष्ट जकात व्हावी म्हणून ती सरचार्जसह डझनास ३॥ आणे करावी अशीही शिफारस बोर्डानें केली आहे. बोर्डाची ही व इतर शिफारशी भारत सरकारनें तत्त्वतः मान्य केल्या आहेत, परंतु प्रथमतः दोन वर्षांपुरतेंच म्हणजे ३१ डिसेंबर, १९५२ पर्यंत संरक्षण द्यावें आणि १९५१ डिसेंबरच्या सुमारास संरक्षणाच्या पहिल्या वर्षांत धंद्यानें केलेल्या प्रगतीचा आढावा टॅरिफ बोर्डानें घ्यावा असें ठरविलें आहे. तसेंच, पहिल्या वर्षानंतर संरक्षण पुढें चालू रहाणें न रहाणें ही गोष्ट धंद्यानें पहिल्या वर्षांत केलेल्या प्रगतीवर अवलंबून राहील.

---

### युरेनियम-थोरियमचा शोध

अणुशक्तीच्या उत्पादनासाठी युरेनियम व थोरियम हे दोन धातू अवश्यमेव लागतात. युरेनियम बेल्जिअम कॉंगो, कॅनडा, चेकोस्लोव्हाकिया, इत्यादि ठिकाणीं सापडतें. इतरहि कांहीं देशांत युरेनियममिश्रित दगड सापडले, तरी त्यांत युरेनियमचा अंश अत्यल्प असतो. तेल, कोळसा किंवा जलनिर्मित वीज ह्यांच्या उपयोगाऐवजीं अणुशक्तीचाच उपयोग जगभर करावयाचें ठरविलें, तर खाणींतील या धातूंचे साठे कांहीं वर्षांतच संपून जातील. नवीन साठ्यांचा शोध लागला तर गोष्ट वेगळी; पण आज उपलब्ध असलेला युरेनियम इतका थोडा आहे कीं, त्याच्या वापरांत अतिशय काटकसर करणें अगत्याचें आहे. त्यामुळें सर्व जगभर युरेनियमसाठी कसून शोध सुरू झाला आहे. त्यामुळें पूर्वी सापडणार नाहीं असें वाटत होतें, अशा ठिकाणींहि कांहीं युरेनियम मिळालें आहे.

---

### युनायटेड बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेच्या कामास १८ डिसेंबर रोजीं प्रारंभ झाला. कॉमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन लि., कॉमिल्ला बँकिंग यूनियन लि., बेंगॉल सेंट्रल बँक लि. आणि हुगळी बँक लि. ह्यांच्या एकत्रीकरणांतून वरील नांवाची बँक २·६३ कोटी रु. वसूल भांडवलाची व १·१९ कोटी रु. रिझर्व्ह फंडाची बनली आहे. भारत सरकारचे माजी व्यापारमंत्री श्री. के. सी. नियोगी हे बँकेचे चेअरमन आहेत. एकूण खेळत्या भांडवलाच्या दृष्टीनें ह्या बँकेचा समावेश "बड्या पांचांत" होत आहे.

---

**ब्रिटनमधील सर्वांत मोठें हॉटेल**—ब्रिटनमधील सर्वांत मोठें व नवीन हॉटेल युद्धकाळांत बांधलेल्या एका हवाई-हल्ल्यापासून संरक्षण करणाऱ्या भुयारांत पूर्ण करण्यांत येत आहे. हें हॉटेल एक मैल लांबीचें व भुयारांतील रेल्वेच्या स्टेशनाच्या खालीं ४५ फुटांवर असेल. हॉटेलांत ४,००० माणसांची एका वेळीं सोय होऊं शकेल.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

(स्थापना १९१८)



हेड ऑफिस—
गिरगांव, मुंबई.

शाखा : दादर, माहीम, मार्केट—बेळगांव


**अमेरिकन तज्ज्ञांची मदत**—बिहारच्या राज्यांत ३५ लाख एकर जमीन लागवडीला आणण्यासारखी, पण आज पडीत आहे. त्या जमिनीचा उपयोग करण्याची एक योजना बिहार सरकारनें आंखली असून एका अमेरिकन शेतकी तज्ज्ञाची मदत घेतली आहे.

**आधी छोटे उद्योगधंदे**—भारताचें झपाट्यानें औद्योगीकरण होण्यासाठी प्रथम छोट्या उद्योगधंद्यांची वाढ झाली पाहिजे असें मत मध्यवर्ती सरकारचे उद्योग व पुरवठामंत्री श्री. मेहताब ह्यांनीं व्यक्त केलें आहे. ह्या उद्योगधंद्यांत पैसे गुंतविणाऱ्यांना सरकार मदत करील असें आश्वासनहि त्यांनीं दिलें आहे.

**ग्वाल्हेरचा कातड्याच्या सामानाचा कारखाना**—ग्वाल्हेर येथील कातड्याच्या कारखान्याची पुनर्घटना करण्याचें मध्यभारताच्या सरकारनें ठरविलें आहे. कारखान्यांतील उत्पादन अधिक कार्यक्षमतेनें व्हावें आणि उत्पादनाची किंमत कमी व्हावी म्हणून ही पुनर्घटना करण्यांत येत आहे. राज्यांतील एका वनस्पतीचा औद्योगिक उपयोग करण्यासाठीं एका जपानी तज्ज्ञाचा सल्लाही घेण्यात येत आहे.

**नॉर्वे कागद पुरविणार**—भारताला नॉर्वेकडून बराच वृत्तपत्रीय कागद मिळूं शकेल अशी वार्ता आहे. नॉर्वेचे भारतांतील प्रतिनिधी म्हणाले कीं, चालू वर्षी भारतानें नॉर्वेकडून १२,००० टन कागद आयात केला आहे. पुढील वर्षी अधिक कागद मिळूं शकेल, परंतु कागदाच्या गांठ्यासाठीं काम करणारे पुरेसे मजूर मिळत नाहींत असें ते म्हणाले.

**बिहारमध्यें ३०० ट्यूब विहिरी**—उत्तर बिहारमधील ऊंस पिकविणाऱ्या भागांत ३०० ट्यूब विहिरी खोदण्याचें काम बिहार सरकारनें एका ब्रिटिश कंपनीकडे सोंपविलें आहे. ह्या कामासाठीं २,६०,००,००० रु. खर्च येणार आहे. ह्याच योजनेंत विजेच्या उत्पादनाचीं ६ केंद्रेंही उभारण्यांत यावयाचीं आहेत. विजेच्या सहाय्यानें पाणी उपसण्याचें काम तर होईलच; पण बऱ्याच खेड्यांनाहि वीज पुरवितां येईल.

**स्पेनला कर्ज देण्यास विरोध**—अमेरिकेनें स्पेनला ६·२ कोटी डॉलर कर्ज देण्याचें ठरविलें आहे. ह्या कर्जाला अमेरिकेच्या सी. आय. ओ. ह्या मजूर संघटनेच्या वहातूक कामगारांनीं आपला विरोध जाहीर केला आहे.

**कमी रबर वापरा**—अमेरिकन सरकारनें नागरिकांना येत्या जानेवारींत व फेब्रुआरींत नैसर्गिक रबर कमी वापरण्याची सूचना दिली आहे. ह्या दोन महिन्यांत नागरी उपयोगासाठीं ९०,००० टन रबर पुरविण्यांत येईल. परंतु तें कृत्रिम असेल. मोटारीच्या टायर्स जुन्या झाल्यावर त्याच पुन्हां व्हल्कनाइझ करून वापराव्या अशी सूचना करण्यांत आली आहे.

**द. आफ्रिकेंतील युरेनिअम**—द. आफ्रिकेंतील जोहान्सबर्ग जवळील सोन्याच्या खाणींतील मातीपासून युरेनियम काढण्यासाठीं नवीन यंत्रसामुग्री बसविण्यांत येणार आहे. हा भांडवली खर्च साउथ आफ्रिकन ॲटॉमिक एनर्जी बोर्ड करणार आहे.

## ग्रेट ब्रिटनच्या आर्थिक परिस्थितीबद्दल कांहीं उद्बोधक आंकडे

( भा. म. का. )

ब्रिटनमधील संपत्तीचें एकंदर उत्पादन १९४९ सालीं ११०० कोटी पौंड असून तें १९४८ च्या मानानें ८ टक्क्यानें वाढलें. संपत्तीच्या एकंदर उत्पादनांत औद्योगिक उत्पादन ५३ टक्के होतें. वाहातूक, व्यापार व तत्सम धंद्यांपासून तें २७ टक्के होतें व शेतीचें ५ टक्के असून बाकीचें १५ टक्के उत्पादन घरांची भाडीं, खाजगी नोकरांचे पगार व सरकारी कार्यें यांपासून झालें. एकंदर उत्पन्नापासून झालेला खर्च पुढीलप्रमाणें विभागला गेला. खाजगी खर्चानें ६२ टक्के वाटा उचलला, १८ टक्के सार्वजनिक सरकारी खर्चाप्रीत्यर्थ खर्ची पडले व २० टक्के नवीन भांडवली खर्चाच्या रूपानें गुंतविलें गेलें. उपभोग्य मालावर खाजगी रीत्या, १९४८ च्या मानानें किंमती स्थिर आहेत असें मानतां २ टक्के खर्च जास्त झाला व १९३८ च्या मानानें ६ टक्के जास्त झाला. १९५० सालीं २२० कोटी पौंड भांडवलाच्या गुंतवणुकींत खर्ची पडतील. हा भांडवली खर्च १९२० ते ३० या काळांतील वार्षिक सरासरी भांडवली खर्चाशीं बरोबरी करणारा आहे. सध्यां ७५ टक्के भांडवली खर्च उद्योगधंदे व शेती यांवर होत आहे, परंतु दुसऱ्या महायुद्धापूर्वी या प्रकारच्या खर्चाचें प्रमाण ६६ टक्के होतें. १९४६ चें औद्योगिक उत्पादन १०० मानल्यास १९४९ चें १२९ झालें व १९५० च्या पहिल्या सहा महिन्यांचें १४० होतें. युद्धपूर्वीच्या मानानें हल्लींचें उत्पादन २५ ते ३३ टक्क्यांनीं ज्यास्त आहे.

युद्धपूर्वीच्या मानानें कोळसा व कापड यांचें उत्पादन मात्र हल्ली कमी आहे. बांधकामाचें वार्षिक प्रमाण युद्धपूर्वीच्या मानानें वाढत जाहे. १९४९–५० चें शेतीचें उत्पादन १९३६–३९ च्या सरासरीपेक्षां ३८ टक्क्यांनीं जास्त आहे. १९५२ मध्यें हें उत्पादन ५० टक्क्यांनीं वाढवावें अशी सरकारी योजना आहे.

१९५० च्या मध्याला २¼ कोटी लोक मुलकी नोकऱ्यांतून होते. उद्योगधंद्यांत १९४९ च्या ऑक्टोबरमध्यें कामाचे आठवड्याचे तास ४५·४ होते, परंतु १९३८ च्या ऑक्टोबरमध्यें हा आंकडा ४६·५ होता. सरकारी आंकड्यांप्रमाणें १९४८ च्या मानानें १९४९ ची कामगारांच्या वेतनाची प्राप्ति ५ टक्क्यांनीं वाढली. १९३८ च्या मानानें सर्व प्रकारच्या मालाच्या व इतर सार्व्हिसेसच्या किंमतींत ८५ टक्के वाढ सध्यां झाली असावी, परंतु भांडवली मालाच्या किंमतींत यापेक्षां थोडी जास्त वाढ झाली. किरकोळ मालाच्या किमती १९४७ सालीं १०० मानल्या तर १९५० च्या जुलैमध्यें त्या ११४ होत्या. मालाची एकंदर निर्गत १९४७ ची १०० मानली तर १९४९ ची १२९ व १९५० च्या पहिल्या सहामाहीची १५६ इतकी झाली. निर्गत व्यापाराच्या दृष्टीनें, निरनिराळ्या प्रकारचीं वाहनें व यंत्रसामुग्री यांची निर्गत विशेष वाढती आहे. विजेचीं उपकरणें, रासायनिक माल, कटलरी, इ. ची निर्गत मध्यम वाढली आहे व कोळसा, लोखंड यांची कमी झाली आहे. १९४९ मध्यें ५० टक्के निर्गत स्टर्लिंग देशांकडे झाली, २५ टक्के पश्चिम युरोपकडे व १० टक्के डॉलर–देशांकडे झाली. परंतु अवमूल्यनानंतर डॉलर देशांकडील निर्गत वार्षिक ५१ कोटी डॉलर्स पासून वार्षिक ६० कोटी डॉलर्स वाढली आहे. डॉलर गटाकडील आयातहि कमी झाली आहे. अमेरिकन व कॅनडाची मदत आणि निश्चयात्मक संयमपूर्वक प्रयत्न यांमुळें १९४६ च्या ३७ कोटी पौंड व १९४७ च्या ६० कोटी पौंड व्यापारी तुटीचें रूपान्तर १९५० च्या पहिल्या सहा महींत ५·१ कोटी अनुकूल तफावत दर्शविणारें झालें आहे.

फोनः ३४५१९ तारः SAHYOG

दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः–

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन. टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.




अल्प खर्चं त्वरित व सहज काम करवून घ

शेतकरी, खाणींतील मजूर, रेल्वे कामग रस्ते तयार करणारे—हे सर्व टाटाची ॲग्रिको फावडींच पसंत करतात. खास उंची कार्बन पोलादी पत्र्यापासून बनविलेलीं फावडीं दीर्घकाल टिकतात-म्हणूनच तीं वापरणें शेवटीं फायदेशीर ठर त्यांच्या सुयोग्य आकारामुळें तीं वापरण्यास अधिक सोईस्कर असतात—व रीतीनें तीं वेळेची व श्रमाची बचत करतात !

अंतिम काटकसरीसाठीं ॲग्रिको हत्यारें खरेदी करा !

टाटा ॲग्रिको अवजारें

A I C TRADE MARK

शाखा : मुंबई, मद्रास, कानपूर, जबलपूर नागपूर, विजयनगरम व सिकंदराबाद

नजिकच्या लोखंडी-सामानाच्या दुकानांत चौकशी करा अगर परस्पर आम्हांला

भारतीय संसदेंत......

## व्यापार मंत्र्यांच्या गळ्याला फांस?

ताग, कापूस आणि लोकर यांच्या निर्गतीवरील कराबाबतच्या बिलावर खूपच वादळें उठलीं, वातावरण तापलें, शब्दाशब्दी झाली आणि ती ऐकून " ताग व्यवसायांतील मंडळी माझ्या मानेभोंवती दोर गुंडाळून मला शेजारच्या झाडावर टांगणार तर नाहींत ना ? " अशी भीति (!) व्यापार मंत्र्यांनीं व्यक्त केली. त्यावर, " तुम्हीं सभागृहाचे लाडके जांवई आहांत " अशी त्यांची मलावण एकानें केली. तेव्हां त्यांच्या वतीनें अर्थमंत्र्यांनीं त्याला उत्तर दिलें, " सासरा व्हावयाचें, तर उतावीळ असून उपयोग नाहीं ! "

या बिलावरील चर्चेच्या सुरवातीलाच एक महत्त्वाचा प्रश्न उद्भवला. कर बसविणें, वाढविणें किंवा कमी करणें हा अधिकार केवळ संसदेचाच आहे. तो अधिकार सरकारला किंवा सरकारी अधिकाऱ्यांना पूर्णतः देऊन टाकणें इष्ट नाहीं. कांहीं विशिष्ट परिस्थितींत, विशिष्ट अटींवर, कांहीं मुदतीपर्यंत, तो द्यावा असें अखेरीस ठरलें व त्याप्रमाणें एक कलम कायद्यांत समाविष्ट करून घेण्यांत आलें आहे.

निर्गत व्यापारांत तागाला विशेष महत्त्व आहे. परदेशी पैसा, मुख्यतः दुर्मिळ डॉलर, मिळवण्याकरितां त्याचा फार उपयोग होतो. ताग ही फाळणी-पूर्व भारताची मक्तेदारी होती. अदमासें ९० लक्ष गांठी ही जगाची गरज. त्यापैकीं ७० लक्ष गांठी पाकिस्तानांत व २० लक्ष गांठी ताग भारतांत होतो. भारतांतील सगळ्या ८४ गिरण्या आठवड्याचे ४८ तास चालल्या तर ६५ लक्ष आणि हल्लींप्रमाणें आठवड्यांत ४२½ तास चालल्या तरी ५२ लक्ष तागाच्या गांठी लागतील. मागील वर्षांतील शिलकी उत्पादन, पाकिस्तानमधून आलेला माल, सर्व हिशेबांत घेऊनही सुमारें १२ लक्ष गांठी कमीच पडतात. वर्षाचे अखेरीस नवीन पीक हातीं येईल, पाकिस्तान रुपयाचा नवीन दर ठरेल व सर्व ठीक होईल अशी आशा आहे.

तागापासून गोणपाट व पोतीं करतात. जगांतील तागाच्या एकूण १ लक्ष, ५० हजार साच्यांपैकीं फक्त ६० टक्के साचे भारतांत आहेत. त्यापैकी १२½ टक्के साचे बंद पडले असून बाकी आठवड्यात फक्त ४२½ तास चालत आहेत. इतरत्र तीन पाळ्यांनीं कामें चालू आहेत. पाकिस्तानी ताग तिकडे जात आहे.

सप्टेंबर, १९४९ मध्यें अवमूल्यन होण्यापूर्वीं हिंदी महाग ताग व त्याचा तयार माल परदेशांत खपायला अडचण पडत होती. अवमूल्यनामुळें ४४ टक्क्यांनीं रुपयाची परदेशांत किंमत उतरली, कोरिया युद्धापासून तर भाव भडकलेच आहेत. बाहेरच्या किंमती वाढल्या तरी देशांतील अंतर्गत तागाच्या व त्याच्या अनुषंगानें इतर पदार्थांच्या आधींच जास्त असलेल्या किंमती वाढूं नयेत म्हणून गोणपाटाच्या निर्गतीवरील कराचा दर टनाला रु. ८० वरून आतां रु. १,५०० वर नेण्यांत आला आहे. कापसाचा भाव दुप्पट झाला असून लोकरीच्या किंमतींत १०० टक्क्यांनीं वाढ झाली आहे. आजच्या परिस्थितींत विनियंत्रण करणें किंवा सरकारनें हा प्रश्न हातीं घेणें शक्य नाहीं, असें सरकारच्या वतीनें सांगण्यांत आलें. निर्गत कराचे दर वर-खालीं करून बाहेरील व अंतर्गत किंमतींतील तफावत शक्यतों भरून काढण्याचा सरकार प्रयत्न करील.

अवमूल्यनानंतरच्या या मध्यंतरीच्या काळांत देशांत आणि परदेशांत तागाचा काळाबाजार बराच झाला. या धंद्यांतील उद्योगपती-व्यापाऱ्यांनीं कमी दरानें बिलें करून जास्तीचा पैसा डॉलर रूपानें अमेरिकेंत सांठविला अन् त्यांतील कांहीं हाँगकाँगला सोनें खरेदी करावयाला गेला. अन् तेथून गोवा-फ्रेंच वसाहतींमार्गें सोन्याच्या रूपानें तो भारतांत अवतरत असल्याच्या सुरम्य कथाही या बिलाच्या चर्चेंत ऐकावयास मिळाल्या !

### सिंघरी येथील कृत्रिम खतांचा सरकारी कारखाना

१९५४ मधील मूळ अंदाजी एकूण खर्च—रु. १९ कोटि, ७९ लक्ष, ऑगस्ट, १९५० अखेर प्रत्यक्ष खर्च—रु. १६ कोटि, ५० लक्ष. जून, १९५१ च्या सुमारास बांधणी काम पुरें होऊन उत्पादनास सुरवात होईल, तोंपर्यंतचा नवीन अंदाजी खर्च—रु. २३ कोटि.

× × ×

ग्रेट ब्रिटनकडून भारताला त्याच्या पौंडी शिलकींपैकीं अजून ६१ कोटी, ९० लक्ष पौंड मिळावयाचे आहेत. त्यापैकीं २१ कोटी पौंड जुलै, १९५१ पासून दर वर्षी ३ कोटि, ५० लक्ष पौंड या दरानें पुढील सहा वर्षांत मिळण्याबाबत भारत-ग्रेट-ब्रिटनचा नुकताच करार झाला.

× × ×

परदेशांतून धान्य आणण्याकरितां आज सुदैवानें हातीं विनिमय साधन आहे. सहा महिन्यांचे आंत हिंदी बंदरांत रोज एक जहाज धान्य उतरवतांना आढळेल, असें अर्थमंत्र्यांनीं जाहीर केलें.

× × ×

भारताच्या किनाऱ्यावरील ७७ टक्के वहातुक हिंदी आगबोट कंपन्या सध्यां करीत असून ऑगस्ट, १९५१ च्या सुमारास ही वहातुक संपूर्णतः त्यांचे हातीं येईल.

परदेशांशीं होणाऱ्या माल वहातुकींत देशी कंपन्यांना उत्तेजन देण्यांत येत आहे. मार्च, १९५० मध्यें ईस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशन ही कंपनी स्थापन करण्यांत आली असून रु. २ कोटी पैकीं ७६ टक्के शेअर भांडवल मध्यवर्ती सरकारनें दिलें आहे आणि बाकी २४ टक्के शेअर्स मॅनेजिंग एजंटसनीं ( सिंदिया कंपनीनें ) घेतले आहेत. परदेशी वहातुकीचें काम सध्यां दोन हिंदी कंपन्या करीत आहेत.

—संजय

### ऑस्टिन मोटारींची डॉलर्सची कमाई

ऑस्टिन मोटार कारखान्यांतून २,५०,००० वी A—४० ऑस्टिन नुकतीच बाहेर पडली. एकूण उत्पादनापैकीं ७९% मोटारी निर्गत झाल्या; त्यापैकी ३७% उत्तर अमेरिकेकडे गेल्या. म्हणजे, A-४० ह्या ऑस्टिन गाडीनें गेल्या तीन वर्षांत ग्रेट ब्रिटनला ७ कोटी डॉलर्स मिळवून दिले. आतां या गाड्यांचें रोजचें उत्पादन ४५० गाड्यांइतकें झालें आहे.

### गोदावरी कालव्यावर उसासाठी ब्लॉक

गोदावरी कालव्यावरील जमीन मालकांना सहकारी पद्धतीनें ऊंस लावण्यास उत्तेजन देण्यांत येणार आहे. किमान २० एकरांचा ब्लॉक ( म्हणजे १० एकर उसासाठी ) मागणारे जमीन मालक पुढें आले तर सरकार ६०० एकर उसासाठी मंजूर करण्यास तयार आहे.

### महाराष्ट्र चेंबरची भारत खरेदी

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सनें आपली स्वतःची इमारत ता. १४ रोजीं खरेदीपत्र करून ताब्यांत घेतली. इमारत म्युझियम नजीक १२, राम्पार्ट रो येथें आहे.

### सरदार पटेलांच्या निधनानिमित्त बँकेची सभा तहकूब

पुणें सेंट्रल को. बँकेच्या बोर्डाच्या रविवार तारीख १७—१२—५० रोजीं मासिक सभेंत भारताचे उप-पंतप्रधान कै. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या शोचनीय निधनाबद्दल दुःखप्रदर्शक ठराव पास करण्यांत आला व सभेचें सर्व नियोजित कामकाज त्यांच्या निधनानिमित्त तहकूब ठेवण्यांत आलें.

### दि असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि.

वरील कंपनीच्या ३१ जुलै, १९५० असेरच्या ताळेबंदांतील कांहीं प्रमुख आंकडे खालीं दिले आहेत:—

| | लक्ष रुपये |
|---|---|
| भांडवल | १०५६ |
| शेअर्सवरील प्रीमिअम | १७५ |
| रिझर्व्ह व इतर फंड | २०५ |
| कराची तरतूद | २३० |
| देणीं | १३० |
| वाटावयाचा नफा | ९२ |

| | लक्ष रुपये |
|---|---|
| इमारती, यंत्रें इ. ( घसारा काढून ) | ७५६ |
| स्टॉक्स व स्टोर्स | ५१७ |
| येणीं | १४६ |
| गुंतवणूक ( रोखे व शेअर्स ) | २८३ |
| रोकड | २०३ |

| | रुपये |
|---|---|
| अहवालाचे वर्षांतील सिमेंटची विक्री | १०,८९,०४,१७४ |
| निव्वळ नफा ( ५१ लक्ष रु. घसारा काढून ) | १,६२,४६,३७३ |
| मॅ. एजंटांचें कमिशन | २३,४१,८३० |
| सुचविलेलें डिव्हिडंड | ८३% |

### वर्तमानपत्रांतील जाहिरातींवरील कर जाणार
### मुंबई सरकारचें ७½ लक्ष रु. नुकसान

वर्तमानपत्रांच्या खरेदी–विक्रीवर मद्रास सरकारनें कर बसविला आहे. त्याचप्रमाणें, मुंबई सरकारनें वर्तमानपत्रांतील जाहिरातींवर कर लादला आहे. अर्थमंत्र्यांनीं पार्लमेंटांत एक बिल मांडलें आहे, तें मंजूर झालें म्हणजे हे दोन्ही कर रद्द व्हावे लागतील. हे कर नवी घटना अंमलांत येण्यापूर्वीं अंमलांत होते, ते २७७ व्या कलमाप्रमाणें, पार्लमेंटानें त्याबाबत कांहीं ठरवीपर्यंत चालू राहूं शकतात. अर्थमंत्र्यांच्या बिलाप्रमाणें, हे कर लादणारे कायदे रद्द केले जाणार आहेत. मद्रासचा कर १ जानेवारी, १९५१ पासून व मुंबईचा कर १ एप्रिल, १९५१ पासून रद्द होईल. अर्थात, वर्तमानपत्रांवरील कराचें तत्त्व नाहींसें होत नसून, हे कर मध्यवर्ती सरकारच्या कक्षेंत गेले आहेत. त्यामुळें मुंबई सरकारचें वार्षिक ७,५०,००० रु. चें नुकसान होणार आहे.

### कर-चुकार हिंदी व्यापाऱ्यास लंडनमध्यें शिक्षा

१६,००० नायलॉन पायमोज्यावरील २,००० पौंड विक्रीकर चुकविल्याबद्दल फ्रामरोज पटेल ह्या हिंदी गृहस्थास लंडन येथील कोर्टानें ३ वर्षांच्या कैदेची शिक्षा सांगितली. कर चुकविण्याच्या बाबतींत सहकार्य करणाऱ्या एका ब्रिटिश फर्मला २,००० पौंड दंड करण्यांत आला. पटेल हा अनेक कंपन्यांच्या वतीनें पायमोजांची ऑर्डर देत असे. हे पायमोजे ग्रेटब्रिटनमधून निर्गत व्हावयाचे आहेत, ह्या दृष्टीनें त्यांचेवर कर घेतला जात नसे. कर चुकविलेले हे पायमोजे नंतर ग्रेट ब्रिटनमध्येंच विकले जात. पटेल हा मुंबई विद्यापीठाचा पदवीधर व बॅरिस्टरची परीक्षा पास झालेला आहे. लंडन स्कूल ऑफ एकॉनॉमिक्समध्यें तो हिंदी विद्यार्थ्यांना शिकवीत असे. त्याचें वय ५६ वर्षांचें आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,[illegible] |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,[illegible] |
| वसूल भांडवल | रु. २,५०,[illegible] |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,[illegible] |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोप[illegible] उपा[illegible]

रावसाहेब य. दृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. वा. ग. धंदुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासो[illegible] विठोबानजिक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( [illegible] मॅनेजर.



# दि भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिस:—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) — श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे [illegible]

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. वाळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्ट[illegible]


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.